(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# स्त्रियांवरील अत्याचार आणि निष्प्रभ संवैधानिक अधिनियम

**सौ. उषादेवी अंकुश कांबळे**

संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

..........................--...............................................................

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार 'कायदयापुढे सर्व समान' असले तरी आज घरी आणि घराबाहेरही स्त्रियांची स्थिती अजूनही फारशी समाधानकारक दिसत नाही. दिल्लीतील स्थिती अजूनही फारशी समाधानकारक दिसत नाही. दिल्लीतील निर्भया हत्याकांड अमृता देशपांडे प्रकरण, हिंगणघाट जळीत प्रकरण किंवा हैद्राबाद —उन्नावमधील प्रकरण हे सर्व चर्चेतील विषय असले तरी दिसणारं हे एक हिमनगाचं टोक आहे. स्त्री चळवळीतील अजून अशी कित्येक अत्याचाराची प्रकरण सर्वांसमोर येणं बाकी आहे. निर्भया प्रकरण आणि हैद्राबाद प्रकरण अशी दोन टोक लक्षात घेता परत एकदा स्त्रियांवरील अत्याचाराची कारण आणि अधिनियमांची चर्चा करणे मला गरजेचे वाटते.

- **अत्याचार:**

'It is the expression of physical force against one or more people, compelling action against one's will or pain of being hurt. It is used as a tool of manipulation and also is an area of concern for law and culture which take attempts to suppress and stop it.'

- **स्त्रियांवरील अत्याचार:**

या प्रश्नाचा अभ्सास करताना स्त्रियांच्या सर्व अवस्थांचा सुध्दा अभ्यास करावा लागतो. ही अवस्था स्त्रीच्या जन्मापुर्वीच (Pre Birth) चालू होते. तिच्यावरील अत्याचाराची सुरुवात ही गर्भावस्थेतच सुरु होते. पुढे बालिकावस्था, किशोर अवस्था, पौगंडावस्था, तारुण्यावस्था आणि उतारवय या सर्व अवस्थामधून जाताना स्त्रीला समाजाकडून तिच्या घरच्यांकडून अनेक प्रकारे अन्याय, अपमान, अत्याचार सहन करावा लागतो.

**अ) शारीरिक त्रास:**

स्त्री—भ्रुणहत्या, स्त्री—बालहत्या, बालविवाह, स्त्री—लिंग अंगविच्छेदन (Female genital multilation) बालवेश्या, शाळेत, कॉलेजमध्ये छेडछाड, ॲसिड फेकणे, बलात्कार, हुंडाबळी, कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांकडून, सहकाऱ्यांकडून शारीरिक सुखाची मागणी करणे, तिचा अनेक प्रकार गैरफायदा घेणे. हुंडयासाठी —पैशासाठी सासरकडून छळ करणे, मारणे, जाळून मारणे, जबरदस्तीचे गर्भारपण लादणे, आरोग्याच्याबाबतीत भेदभाव इत्यादी.

**ब) मानसिक त्रास:**

मुलगी म्हणून हिणवणे, तिच्या प्राथमिक गरजांकडे दुर्लक्ष करणे, शाळेत, खेळात टिंगल—टवाळी करणे, तिच्या शारिरीक अवस्थांवरुन हिणवणे, तिची छेडछाड करणे, लग्नानंतर मुलगाच पाहिजे म्हणून धमकावणे, मुलगी झाल्यास हिणवणे, छळ करणे, सर्व ठिकाणी कमीपणा देणे, पाणउतारा करणे इत्यादी.

**क) आर्थिक त्रास:**

लहानपणापासून परावलंबित्व, कामाच्या ठिकाणी पगार देण्याबाबत भेदभाव, वडिलांच्या, पतीच्या मालमत्तेत वाटेकरी म्हणून डावलले जाणे, पतीकडून घरखर्चासाठी तिच्या खर्चासाठी पुरेशी रक्कम न मिळणे, घरच्यांचा घराबाहेर कामासाठी विरोध असणे इत्यादी.

**ड) सामाजिक त्रास:**

समाजात नेहमीच पुरुषानंतर दुय्यम स्थान व वागणुक, बालविवाह, सतीप्रथा, लग्न इ. सामाजिक संस्कार जबरदस्तीने लादणे. सर्व सामाजिक ठिकाणी कमीपणा देणे इत्यादी.

**इ) राजकीय त्रास:**

तिला सर्व राजकीय अधिकारांपासून वंचित ठेवणे, दुर्लक्ष करणे, तिच्या अधिकारपदाचा गैरफायदा घेणे, तिला घरात ठेऊन तिचे सर्व अधिकार वापरणे, घरात किंवा कामाच्या ठिकाणी

निर्णय प्रक्रियेतून डावलले जाणे, गृहित धरणे, राजकारणात येऊ न देणे, राजकारणातील स्त्रियांना सर्व प्रकारे त्रास देणे.या सर्व घटकांचा विचार करता स्त्रीचे संपूर्ण जीवनच अन्याय, अपमान आणि अत्याचाराने भरलेले दिसते. ज्याची जाणीव खरेतर खुद्द त्या स्त्रीला सुध्दा नसते की आपण कशा प्रकारे बळी जात आहोत.

२२ ऑक्टोबर २०१९ च्या दै. हिंदूनुसार NCRB (National Crime Record Bureau) ने प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार स्त्रियांवरील अत्याचारासंदर्भात ३,५९,८४९ केसेस दाखल झाल्या आहेत. यामधील माहितीनुसार उत्तर प्रदेशानंतर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र तर तिसऱ्या क्रमांकावर पश्चिम बंगाल आहे. यामध्ये पती आणि त्याचे इतर नातलगांकडून छळ (२७%), विनयभंग (२१.७%) पळवून नेणे आणि डांबून घालणे (२०.५%) आणि बलात्कार (७%) अशा पध्दतीचे गुन्हे नोंद आहेत. या रिपोर्टनुसार पळवून नेणे आणि डांबून घालण्याच्या ६३,३४९ केसेस पैकी ४२,६९१ केसेस तसेच बेपत्ता नोंदी ७०,४४० पैकी ४६,७९८ नोंदी हया मुलींच्या संदर्भात आहेत. स्त्रियांवरील अत्याचाराबाबतचा NCRB च्या २०१८ च्या रिपोर्टचा हा आकडा ८९,०९७ इतकर होता. तर २०१७ च्या रिपोर्टमध्ये ८६,००१ इतक्या केसेस दाखल झाल्या होत्या.शतकानुशतके होत आलेल्या या अत्याचारासंदर्भात अनेकांनी अनेकवेळा आवाज उठवले. प्रयत्न केले गेले. स्त्रियांसाठी संयुक्त राष्ट्राची सिडा कमिटी स्थापन झाली जी स्त्रियांची न्याय बाजू मांडते आणि त्यांना न्याय देण्याचे, विकास करण्याचे काम करते. वर्ष १९७५ हे संयुक्त राष्ट्र संघाने महिला वर्ष म्हणून तर १९७५ ते १९८५ पर्यंत महिला दशक म्हणून घोषित केले.भारतातही राजा राममोहन रॉय यासारख्या अनेक समाजसुधारकांमुळे सतीबंदी, बालविवाह बंदी, विधवा पुर्नपित्रववाह इ. कायदयांची अंमलबजावणी झाली. आज २१ व्या शतकापर्यंत स्त्रियांच्या जीवनात बऱ्यापैकी परिवर्तन घडून आले आणि त्यांची स्थिती सुधारली असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटनेने वेळोवेळी कायदे करुन स्त्रियांना संरक्षण आणि न्याय देण्याचे काम केले आहे. यातील महत्त्वाचे कायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**भारतीय राज्यघटनेने केलेले अधिनियम:**

१) बंगाल सती प्रथा निषेध अधिनियम १८२९
२) हिंदू विधवा पुनर्विवाह अधिनियम १५—१८५६
३) महिला शिशू हत्या अधिनियम १८६९
४) भारतीय विवाह विच्छेद अधिनियम १८७०
५) बालविवाह प्रतिबंधक अधिनियम १९०१
६) भारतीय दंड संहिता १८६० धारा ३५४,३६६,३६६.।, ३६६.ठ, ३७३,३७३- A,३७३-B, ३७३-C,३७३-D,४९४, ४९६,४७६
७) सिविल प्रोजिजर कोड १९०८ धारा ५५,५६,६०
८) अनैतिक व्यापार (प्रतिबंधक ) अधिनियम १९५६
९) भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५
१०) संयुक्त राष्ट्र महासभा घोषणा १९६७
११) हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१
१२) चिकित्सकीय गर्भपात अधिनियम १९७१
१३) अपराध दंड संहिता १९७४ धारा ४७ (२), ५१ (२), ९५,१२५,१२८,१६०(१), ३६०(१), ४१६
१४) समान वेतन अधिनियम १९७६
१५) परिवार न्यायालय १९८५
१६) मुस्लिम महिला तलाक अधिनियम १९८६
१७) भारतीय संविधान कलम १४,१५,१६,४२,५१ ;द्ध (८), ४९.
१८) विशाखा मार्गदर्शक तत्त्वे १९९७
१९) देवदासी प्रथा निर्मुलन अधिनियम, महाराष्ट्र २००५

निसर्गदत्त देणगी जशी पुरुषांस लाभली आहे. त्यापेक्षा कितीतरी पटीने स्त्रीला लाभली आहे. स्त्रिया या आकर्षक, सहनशील, कामाप्रती निष्ठावान, चतुर कार्यसंचालक असतात. भारतीय स्त्रिया तर एका सर्वेक्षणानुसार दिवसाचे १८ तास काम करतात. ही वरील कायदयांची यादी पाहता असा समज होऊ शकतो की, आज भारतीय स्त्री स्वतंत्र आहे, सुरक्षित आहे. परंतु NCRB चे आकडे वेगळेच सांगतात. ज्या पध्दतीचे कायदे केलेले आहेत. त्यानुसार स्त्रियांच्या जीवनात थोडयाफार सुधारणा झाल्या असल्या तरी अत्याचाराचे प्रमाण कमी झाले नाही. उलट त्याचे स्वरुप अजूनच हिन, भयावह पध्दतीचे झाले आहे.

- **स्त्रियांवरील अत्याचाराचे सदय:कालीन स्वरुप:**

१) स्त्री—भ्रुणहत्येत वाढ: लिंग गुणोत्तरात वाढती दरी
२) शाळेतील मुलींवर लहाणपणापासून जन्मदाते वडील, घरातील इतर नातलग, शाळेतील शिक्षक, बस ड्रायव्हर यांच्याकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचारात वाढ.
३) हुंडाबळी, पैशासाठी सुनेला जाळून मारणे असे प्रकार कमी असले तरी त्याचे स्वरुप बदलले दिसते.
४) सुनेचा फ्लॅटसाठी, लग्नातील मान—पानसाठी, दागिन्यांसाठी पैशांसाठी मानसिक आणि शारिरीक छळ केला जातो.
५) स्त्रियांचा विनयभंग, पळवून नेणे इ. प्रकारच्या गुन्हयात वाढ.
६) वंशाला दिवाच पाहिजे म्हणून अजूनही स्त्रीवर पती व सासरकडून दबाव आणला जातो.
७) बेकायदेशीर स्त्री—भ्रुणहत्येत आणि अशा हत्या करणाऱ्या डॉक्टरांमध्ये वाढ हा धंदा मोठया प्रमाणात महाराष्ट्र —कर्नाटक सीमेवर चालतो.
८) आधी 'कमी शिकलेली', 'अशिक्षित' असे म्हणून सूनेचा पाणउतारा होत असे, आता 'जास्त शिकलेली', जास्त अक्कल आलेली' असे पावला—पावलाला हिणवले जाते.
९) आजही स्त्रीच्या गुणांची शिक्षणाची नवऱ्यापुढे कोणतीच किंमत नाही. तिच्या गुणांची, शिक्षणाची कदर केली जात नाही. ती बाहेर कामासाठी परवानगी शिवाय जाऊ शकत नाही.
१०) मदयपी पुरुषांच्या प्रमाणात प्रचंड वाढ यामुळे स्त्रियांना जास्त प्रमाणात कौटुंबिक हिंसाचाराला तोंड दयावे लागते.
११) कामाच्या ठिकाणी कामाच्या आणि पगाराच्या बाबतीत भेदभाव केला जातो. गृहिणींना तर घरखर्चासाठी स्वखर्चासाठी सुध्दा नवऱ्याकडून पैसे मिळत नाहीत.
१२) राजकारणातील स्त्रियांची स्थिती अजून वाईट आहे. तिला या क्षेत्रात येऊच दिले जात नाही.
१३) राजकारणातील मुद्दयांवर ती आपले मत मांडू शकत नाही. नविन बदल करु शकत नाही. तिचे अधिकार इतरांकडून जास्त वापरले जातात.
१४) कामाच्या ठिकाणी वरीष्ठ आणि सहकारी यांच्याकडून विनयभंग, लैंगिक अत्याचाराच्या गुन्हयात वाढ.
१५) स्त्रियांना अजूनही कुटुंबात आणि घराबाहेर गृहित धरले जाते तिला निर्णयप्रक्रियेत सहभागी करुन घेतले जात नाही.

अलिकडील निर्भया प्रकरणावरुन एक गोष्ट लक्षात येते की, 'Justice delayed justice denied' देशात १८३८ बलात्काराचे खटले गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहेत. अमृता देशपांडे प्रकरण, हिंगणघाट, उन्नाव, हैद्राबाद प्रकरण हे सर्व फक्त आता 'classic cases'?' म्हणून बघितले जातात. बलात्कारासारख्या गुन्हयामध्ये आरोपिंना शिक्षा होण्याचे प्रमाण हे फक्त ३२% आहे. स्त्रियांसाठींच्या कायदयावर संसदेत विस्तृत चर्चा होते परंतु त्याचे कडक कठोर कायदयात रुपांतर होताना मात्र दिसत नाही. स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण तीन पटीने वाढले असता त्यांनी करावे काय हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याविषयी खुली चर्चा होऊन उपायांवर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

- **स्त्रियांवरील अत्याचा रोखण्याचे उपाय:**

१) स्त्रियांना प्रथम ती एक माणूस आहे याची जाणिव करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. ही जाणिव तिला आणि इतरांना असणे गरजेचे आहे.

२) ‘गृहलक्ष्मी’, ‘ममतेची मुर्ती’, आईची माया’, इ. विशेषणे फक्त एक कल्पना असून वास्तवात ते अनुवांशिकतेने स्त्रियांना असे भासवून emotional blackmail च केले जाते समजावयास हवे.

३) जबाबदारीची जाणिव ही कुटुंबातील प्रत्येकालाच असायला हवी कामावरुन भेदभाव असता कामा नये.

४) स्त्रीने योग्य वेळी ‘नाही’ म्हणणे शिकावयास हवे.

५) ‘स्त्री ही अवला नसून सबला आहे याची जाणिव विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.

६) ‘मीच माझी रक्षक’ असे म्हणून प्रत्येक परिस्थितीला शिक्षणाचा, बुध्दीचा, कौशल्याचा वापर करुन तोंड देता आले पाहिजे.

७) घरी, शाळैत मुलांना शारीरिक अवस्थेवरुन भेदभाव न करता त्यांना Co-education दयायला हवे.

८) डॉ. विजया रहाटकर आणि ॲड जाई वैदय यांच्या मते जे स्त्रियांचे गुन्हेगार आहेत. त्यांचा mindset अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेच समाजानेही आता आत्मचिंतन करणे गरजेचे आहे.

९) कुटुंबाने, समाजाने तिला गृहित न धरता सर्व निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले पाहिजे.

१०) लहान मुलांच्याबाबतीत कुटुंबाने अधिक खबरदारी घेतली पाहिजे आणि मुलांना चांगले—वाईट तसेच स्पर्शाविषयी अधिक माहिती दिली पाहिजे.

११) स्त्रीने आपल्या शिक्षणाचा, बुध्दीचा, कौशल्याचा विकास करुन लवकरात लवकर स्वत:च्या पायावर उभे राहावयास हवे.

१२) तिच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय, अत्याचार होत असेल तर लोकलाजेस्तव, घाबरुन न बसता त्या अन्यायाविरुध्द आवाज उठवला पाहिजे.

१३) स्त्रियांवरील अत्याचार रोखण्याचे जे कायदे केलेले आहेत. त्यात सुधारणा करुन अधिक कडक कायदे व्हायला हवेत.

१४) अलीकडील एका वृत्तवाहिनीला माहिती देताना निलम गोऱ्हे यांनी दिशा कायदयात अजून सुधारणा करत आहोत याची माहिती दिली. या कायदयानुसार कोर्टात स्त्रियांसाठी, मुलांसाठी पायाभूत सुविधा पुरवणे, निर्माण करणे इ. सुविधांचा विचार केला जाते आहे.

१५) धर्माधिकारी यांच्यानुसार अजूनही Police manual मध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे.

१६) स्त्रियांसाठी वेगळे Functional पोलीस स्टेशन हवे तसेच कोर्टातील प्रक्रिया Fast track हवी म्हणजे स्त्रियांना न्याय मिळण्यास मदत होईल.

**समारोप:** शतकानुशतके होत असलेला स्त्रियांवरील अत्याचार एका दिवसात नाही कमी होत ही वस्तुस्थिती असली तरी समाजाने हळूहळू प्रथम स्त्री ही माणूस आहे आणि ती देखील स्वतंत्र आहे तिला देखील आचार—विचाराचे स्वातंत्र्य आहे एवढी जाणिव जरी स्विकारली असली तरी वाढते अत्याचार समाजाचा खालावलेला दर्जाच स्पष्ट करत आहे. अशा वेळी स्त्रीवादी चळवळीने आणखी जोर धरुन प्रत्येक स्त्रीमध्ये जाणिव निर्माण करायला हवी. फक्त स्त्रीच स्वत:ची मदत स्वत: करु शकते.

**सदंर्भसूची:**

१) महिलाओं के मौलिक अधिकार रमा शर्मा एम.के. मिश्रा

२) स्त्रीविकासाचे नवे क्षितिज— डॉ. स्वाती कर्वे

३) स्त्रीवाद सुमती लांडे

४) स्त्रीवादी सामाजिक विचार—विदयूत भागवत

५) Violence Against Women-Poonam Dhanda

६) ncrb.gov.in

७) https://www.thehindu.com

८) https://www.nationalheraldindia.com

९) https://theprint.in